# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२ ०६०१, २२६९ ०६०२, २२६४ ११५०/५१, फॅक्स - २२६९ २१०२.
तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


**अधिसूचना** **क्रमांक : २अ/एडीएम/अधिसूचना/एस टी /२००८/१८१८**
**दिनांक : ३.७.२००८**

प्रथम वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी **अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ**

शासनाने **अनुसूचित जमातीच्या** विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दिनांक ३०.९.२००८ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. त्यामुळे तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेमार्फत शैक्षणिक वर्ष २००८-०९ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी एमएचटी-सीईटी उत्तीर्ण झालेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गात असलेल्या मात्र जात वैधता प्रमाणपत्र नसल्यामुळे खुल्या प्रवर्गातून ज्या उमेदवारांनी अर्ज स्विकृती केंद्रांवर (ARC) दिनांक २०.६.२००८ पासून दिनांक २७.६.२००८ पर्यंत अर्ज सादर केले आहेत आहेत अशा अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनी जातीच्या प्रमाणपत्रासह अर्ज सादर केलेल्या अर्ज स्वीकृती केंद्रावर जावे. जात प्रमाणपत्र सादर करताना कमीत कमी रूपये ५०/-च्या नॉन ज्युडिशिअरी स्टॅंपपेपरवर हमीपत्र (Undertaking) अर्ज स्विकृती केंद्रांवर (ARC) **दिनांक ४.७.२००८ ते ५.७.२००८ या कालावधीत** सादर करावे. तसेच हमीपत्र सादर करताना **पूर्वी अर्ज स्वीकृती केंद्राकडून मिळालेली Receipt cum Acknowledgement परत करून अनुसूचित जमाती मध्ये समावेश करण्याबाबतचा अर्ज देऊन नवीन Receipt cum Acknowledgement घेण्यात यावी.** जे उमेदवार या कालावधीत त्यांचे जात प्रमाणपत्र सादर करून अशी Receipt cum Acknowledgement संबंधित अर्ज स्वीकृती केंद्राकडून घेतील अशाच उमेदवारांचा समावेश अनुसूचित जमातीच्या प्रवर्गात समावेश करण्यात येईल.

**सही/-**
**(डॉ.एस के महाजन)**
**प्र.संचालक,तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई**

रु.५०/- च्या नॉन ज्युडीशियल स्टॅम्पपेपरवर खाली नमूद केलेले हमीपत्र सादर करावे

हमीपत्र

शासन परिपत्रक आदिवासी विकास विभाग क्रमांक एसटीसी-१०००/प्र.क्र.२६१/का.१० दिनांक १.७.२००८अन्वये मी ..............................असे हमीपत्र देतो की, जात पडताळणीबाबतची आवश्यक ती सर्व कागदपत्रे मी इयत्ता १२ वी उत्तीर्ण झालेल्या ............... या महाविद्यालयात सादर केलेले आहे / दि.१५ जुलै २००८ पर्यंत सादर करणार आहे. जर मला या प्रवेश प्रक्रियेत प्रवेश मिळाला तर जात पडताळणीकरीता कागदपत्रे सादर केल्याबाबतचा पुरावा प्रवेशाच्या वेळी सादर करण्यात येईल तसेच सदर संस्थेत जात वैधता प्रमाणपत्र दि.३०/९/२००८ पर्यंत सादर करीन.

जात वैधता प्रमाणपत्र दि.३०/९/२००८ पर्यंत सादर न केल्यास किंवा माझे जात वैधता प्रमाणपत्र कोणत्याही कारणास्तव मिळण्यास उशिर झाल्यास पर्यायाने प्रथम वर्ष अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमासाठी मिळालेला प्रवेश रद्दबातल झाल्यास त्याची जबाबदारी महाराष्ट्र शासन व तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची राहाणार नाही व सदर जबाबदारी सर्वस्वी माझी राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| विद्यार्थ्याचे नांव | : | पालकाचे नांव | : |
| विद्यार्थ्याची स्वाक्षरी व दिनांक | : | पालकाची स्वाक्षरी व दिनांक | : |
| जातीचा प्रवर्ग/ जातीचे नांव | : | | |
| एमएचटी सीईटी रोल नंबर | : | | |